दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

■ आरएनआय : MAHMAR/2021/85884 — सोमवार, दि. २५ मे, २०२६ — ■ वर्ष - १ ■ अंक - २३९ ■ पाने - ४ — पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

सोमवार दि. २५ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, दशमी रात्री ५-११ पर्यंत नंतर एकादशी तिथी, दिवस नक्षत्र– उत्तरा रात्री ४-०९ पर्यंत नंतर हस्त, चंद्र रास - सिंह सकाळी ९-०९ पर्यंत नंतर कन्या, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

### उष्णतेचा वाघांवर परिणाम

**चंद्रपूर** : सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील गुंजेवाही येथे चार महिलांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनेनंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली असताना, या घटनेकडे केवळ 'नरभक्षक वाघ' म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही, असा महत्त्वपूर्ण इशारा वन्यजीव तज्ज्ञांनी दिला आहे. वाढत्या तापमानामुळे वाघांच्या वर्तनात बदल होत असून 'थर्मल स्ट्रेस'मुळे त्यांची आक्रमकता वाढत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. उष्णतेमुळे हा 'थर्मल स्ट्रेस' निर्माण होत आहे.

## सारांश वृत्त

### बिहारमध्ये उष्णतेची तीव्र लाट कायम

**पाटणा** : बिहारच्या अनेक भागात उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसला असून राज्यात किमान १० ठिकाणी तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेले. रोहतास जिल्ह्यातील डेहरी येथे ४४.८, बक्सरमध्ये, कैमूरमध्ये ४३.७ आणि औरंगाबादमध्ये ४३.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. गयाजी आणि शेखपुरा येथे प्रत्येकी ४२.८ अंश सेल्सिअस, सारण (४१.२), पाटणा (४१.२), अरवल (४०.५) आणि नालंदा (४०.) अशी तापमानाची नोंद झाली.

### करन्सी चेस्टमधून ८.७ कोटी चोरले

**अहमदाबाद :** रिझर्व्ह बँकेच्या तिजोरीतून ८.७ कोटी रुपयांची तस्करी केल्याच्या आरोपाखाली एका सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे. सहाय्यक पोलिस आयुक्त हितेंद्र चौधरी यांनी सांगितले की, गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बँक ऑफ बडोदाचे कनिष्ठ कस्टोडियन हरसिद्ध कादियार याला अटक केली, ज्याने १३ जानेवारी रोजी कोट्यवधींची चोरी केली होती. कादियार यांना २७ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### पाकच्या संपर्कातील तरुणाला अटक

**हैदराबाद :** पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआयच्या पाठिंब्याने गुन्हेगारी टोळीत सामील होण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली एका २२ वर्षीय तरुणाला ताब्यात घेण्यात आले आहे. उत्तर प्रदेशचा झायेद खान दोन महिन्यांपूर्वी हैदराबादला आला होता आणि मेडचल भागातील एका हॉटेलमध्ये काम करत होता. पाकच्या आयएसआयने पाठिंबा दिलेल्या एका गटाशी ऑनलाइन संपर्कात तो होता.

---

**सिस्को सिस्टिम्सकडून ४ हजार कर्मचाऱ्यांना बाहेरचा रस्ता**

# एआयच्या लाटेत पुन्हा नोकरकपात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि नव्या तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे जागतिक टेक इंडस्ट्रीमध्ये पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर नोकरकपातीची लाट आली आहे. सिस्को सिस्टम्सने तब्बल ४ हजार कर्मचाऱ्यांची कपात करण्याची घोषणा केली असून, कंपनीच्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी जवळपास ५ टक्के कर्मचारी या निर्णयामुळे प्रभावित होणार आहेत.

मेटा, लिंक्डइन, ओरॅकल, आयबीएम आणि सेल्सफोर्स यांच्यानंतर आता सिस्को सिस्टिम्सनेही पुनर्रचनेच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपातीची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे, कंपनीने हा निर्णय आर्थिक अडचणींमुळे घेतलेला नसून एआय आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्यासाठी घेतल्याचे स्पष्ट केले आहे. सिस्कोचे मुख्य कार्यकारी अधिकारी चक रॉबिन्स यांनी सांगितले की, "एआयच्या युगात स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कंपन्यांना आपल्या गुंतवणुकीचे प्राधान्यक्रम बदलावे लागणार आहेत."

सिस्कोने नुकत्याच जाहीर केलेल्या तिमाही आर्थिक अहवालात १५.८४ अब्ज डॉलर्सचे विक्रमी उत्पन्न नोंदवले आहे. हे उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे १२ टक्क्यांनी अधिक आहे. कंपनीला एआय इन्फ्रास्ट्रक्चरशी संबंधित ५.३ अब्ज डॉलर्सच्या ऑर्डर्स मिळाल्या असून, आर्थिक वर्षअखेर हा आकडा ९ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

या पुनर्रचनेअंतर्गत कंपनी आता एआय, सायबर सिक्युरिटी, सिलिकॉन चिप्स, ऑप्टिक्स आणि डेटा सेंटर नेटवर्किंग यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करणार आहे. यासाठी सुमारे १ अब्ज डॉलर्स खर्च केले जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

गेल्या काही महिन्यांत अनेक तंत्रज्ञान कंपन्यांनी एआय-केंद्रित धोरण स्वीकारत पारंपरिक विभागांतील कर्मचाऱ्यांची संख्या कमी केली आहे. त्यामुळे जागतिक टेक क्षेत्रात नोकरीची असुरक्षितता वाढताना दिसत आहे. एकीकडे एआयमुळे कंपन्यांचे उत्पन्न आणि शेअर बाजारातील कामगिरी सुधारत असताना, दुसरीकडे हजारो कर्मचाऱ्यांच्या भवितव्याबाबत चिंता वाढत आहे.

दरम्यान, कर्मचारी कपातीच्या घोषणेनंतर सिस्कोच्या शेअर्समध्ये १६ टक्क्यांहून अधिक वाढ झाली. गुंतवणूकदारांनी कंपनीच्या एआय-केंद्रित धोरणाला सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे यातून स्पष्ट होत आहे.

---

## होर्मुझमधून जहाज वाहतूक पुन्हा सुरू होणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या संघर्षामुळे जगभरातील अर्थव्यवस्थेवर निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आता दिलासादायक घडामोड समोर आली आहे. पुढील ३० दिवसांत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यापारी जहाजांची संख्या हळूहळू पूर्वपदावर आणली जाईल, असे संकेत इराणकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे जागतिक इंधनपुरवठा आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराला काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाच्या ऊर्जा वाहतूक मार्गांपैकी एक मानली जाते. जगातील सुमारे २० टक्के कच्च्या तेलाचा पुरवठा या मार्गातून होतो. अमेरिका-इराण संघर्षानंतर हा मार्ग अंशतः विस्कळीत झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी उसळी पाहायला मिळाली होती.

इराणच्या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, होर्मुझ मार्गावरील परिस्थिती पूर्णपणे पूर्ववत होणार नसली, तरी व्यापारी जहाजांची वाहतूक हळूहळू वाढवण्यासाठी योजना तयार केली जात आहे. इराणने हा करार मर्यादित स्वरूपाचा असल्याचे स्पष्ट केले असले, तरी जगभरात त्यामुळे सकारात्मक संदेश गेला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून पश्चिम आशियात तणाव तीव्र झाला होता. अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ले सुरू केल्यानंतर इराणने आखाती भागातील अमेरिकन लष्करी तळांवर प्रत्युत्तरात्मक कारवाया केल्या. त्याचवेळी होर्मुझ सामुद्रधुनीतून होणाऱ्या जहाजवाहतुकीवर निर्बंध आणले. यामुळे जागतिक इंधन पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला.

---

## राज्यात इंधनाचा पुरेसा साठा : दत्तात्रय भरणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून घाईघाईने इंधन साठवणूक करू नये, असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये डिझेलसाठी रांगा लागल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही भूमिका स्पष्ट केली.

पश्चिम आशियातील तणाव, होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळे आणि इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील अनेक भागांत पेट्रोल-डिझेल टंचाईच्या अफवा पसरल्या आहेत. परिणामी, विशेषतः ग्रामीण भागात शेतकरी आणि वाहनधारकांनी मोठ्या प्रमाणावर इंधन खरेदी सुरू केली. यामुळे अनेक पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लागल्या असून काही ठिकाणी "नो डिझेल"चे फलकही लावण्यात आले आहेत.

कृषिमंत्री भरणे यांनी स्पष्ट केले की, राज्यात प्रत्यक्षात इंधनाचा तुटवडा नसून नागरिकांनी भीतीपोटी मोठ्या प्रमाणावर साठवणूक सुरू केल्याने तात्पुरता दबाव निर्माण झाला आहे. त्यांनी पेट्रोल पंप चालकांनाही शेतकऱ्यांना सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत. शेतकऱ्यांना ड्रममध्ये डिझेल देण्यास नकार देऊ नये, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, राज्यातील बुलढाणा, अकोला, वाशीम, जालना आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये डिझेलच्या मागणीत अचानक मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे पंपांवर गर्दी होत आहे.

---

**राहुल गांधींचा दावा, केंद्रातील राजकारण पुन्हा तापले**

# मोदी सरकार एका वर्षात कोसळेल..!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारबाबत अत्यंत मोठा राजकीय दावा करत पुढील एका वर्षात सरकार कोसळेल, असे विधान केले आहे. वाढती महागाई, बेरोजगारी, आर्थिक अस्थिरता आणि जनतेतील असंतोष यामुळे देशातील राजकीय समीकरणे झपाट्याने बदलतील, असा दावा त्यांनी केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे देशाच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

दिल्लीतील काँग्रेसच्या अल्पसंख्याक सल्लागार समितीच्या बैठकीत बोलताना राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. काँग्रेसचे राज्यसभा सदस्य इम्रान प्रतापगढी यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत देशातील आर्थिक परिस्थिती, सामाजिक तणाव, युवकांमधील असंतोष आणि रोजगाराच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत सुमारे दोन तास विविध मुद्द्यांवर विचारमंथन झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राहुल गांधी म्हणाले की, देशातील सामान्य नागरिकांवर आर्थिक दबाव सातत्याने वाढत आहे. महागाईमुळे मध्यमवर्ग आणि गरीब कुटुंबांचे अर्थकारण विस्कळीत झाले असून, बेरोजगारीमुळे युवकांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे. ते म्हणाले की, "देशात एक मोठे आर्थिक वादळ तयार होत आहे. जनतेतील असंतोष दिवसेंदिवस वाढत आहे. सत्ताधारी पक्षाला याची कल्पना नसली तरी आगामी काळात त्याचे गंभीर परिणाम दिसतील." राहुल यांनी यापूर्वीही अनेकदा केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीका करत "देशातील अर्थव्यवस्था काही मोजक्या उद्योगपतींच्या फायद्यासाठी चालवली जात आहे" असा आरोप केला होता.

राहुल गांधी यांच्या या विधानानंतर भाजपने काँग्रेसवर तीव्र पलटवार केला. केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी राहुल गांधी यांचे वक्तव्य हे "देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न" असल्याचे म्हटले. जनतेने सलग तिसऱ्यांदा मोदी सरकारला स्पष्ट जनादेश दिला असून विरोधकांकडे कोणताही सकारात्मक अजेंडा नसल्याची टीकाही त्यांनी केली.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही राहुल गांधी यांच्या विधानाची खिल्ली उडवली. "हे फक्त मुंगेरीलाल के हसीन सपने आहेत," असे म्हणत त्यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) मजबूत असल्याचा दावा केला. मोदी सरकार स्थिर असून विकासाच्या मुद्द्यावर जनतेचा विश्वास कायम असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राहुल यांच्या या विधानामुळे सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

---

**तृणमूल चौथ्या स्थानावर फेकली गेली**

# फाल्टा पोटनिवडणुकीत भाजपचा दणदणीत विजय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील फाल्टा विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपने ऐतिहासिक विजय मिळवत तृणमूल काँग्रेसला मोठा धक्का दिला आहे. भाजपचे उमेदवार देबांगशू पांडा यांनी तब्बल ७६ हजारांहून अधिक मतांची आघाडी घेत विजय संपादन केला. या निकालामुळे फाल्टा मतदारसंघातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलल्याचे मानले जात आहे.

मतमोजणीच्या अंतिम कलानुसार, देबांगशू पांडा यांना १ लाख ११ हजार २७० मते मिळाली. माकपचे उमेदवार शंभूनाथ कुर्मी यांना ३४ हजार ८७३ मते मिळाली, तर काँग्रेसचे अब्दुर रज्जाक मोल्ला ९ हजार २८४ मतांसह तिसऱ्या स्थानावर राहिले. विशेष म्हणजे, सत्ताधारी तृणमूल काँग्रेसचे उमेदवार जहांगीर खान यांना केवळ ५ हजार ३१९ मते मिळाल्याने पक्ष चौथ्या क्रमांकावर फेकला गेला.

फाल्टा हा मतदारसंघ दीर्घकाळ तृणमूल काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जात होता. डायमंड हार्बर परिसरातील संघटनात्मक ताकदीचे प्रतीक म्हणून तृणमूलने या भागाचे वारंवार उदाहरण दिले होते. मात्र, या निकालाने त्या दाव्याला मोठा धक्का बसला आहे. निवडणुकीपूर्वी भाजप आणि तृणमूल यांच्यात जोरदार प्रचारयुद्ध रंगले होते. मात्र मतदानाच्या अवघ्या दोन दिवस आधी तृणमूलचे चर्चेत असलेले उमेदवार जहांगीर खान यांनी अचानक माघार घेतल्याने संपूर्ण राजकीय समीकरण बदलले.

---

### एकनाथ शिंदे यांची दिल्लीवारी

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज म्हणजेच रविवार २४ मे रोजी अचानक दिल्ली दौऱ्यावर रवाना झाल्याने राज्याच्या राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. दिल्लीमध्ये ते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार असून, या बैठकीत महायुतीतील विधान परिषद निवडणुकीच्या जागावाटपासह महत्त्वाच्या राजकीय घडामोडींवर चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी १८ जून रोजी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी महायुतीमध्ये जागावाटपाचा प्राथमिक फॉर्म्युला निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे.

---

## घुसखोरांविरोधात कठोर कारवाई

**बांगलादेशी-रोहिंग्यांविरोधात बंगाल सरकारचा निर्णय**

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांविरोधात राज्य सरकारने मोठे आणि निर्णायक पाऊल उचलले आहे. बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना त्यांच्या मूळ देशात परत पाठवण्यासाठी विशेष तात्पुरती निवास केंद्रे उभारण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत.

या संदर्भात राज्य सरकारने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना लेखी मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, त्यांच्या कार्यक्षेत्रात योग्य ठिकाणांची निवड करून ही केंद्रे तातडीने कार्यान्वित करण्याचे आदेश दिले आहेत. सीमावर्ती जिल्हे आणि संवेदनशील भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून, अशा भागांमध्ये अवैध स्थलांतरित लपून बसण्याची शक्यता अधिक असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हा निर्णय घेतला असून, अवैध स्थलांतरितांवर अधिक काटेकोर नजर ठेवणे आणि त्यांची ओळख पडताळणी प्रक्रिया वेगाने पूर्ण करणे हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे सांगण्यात आले आहे. सरकारच्या नियोजनानुसार, पकडण्यात आलेल्या बेकायदेशीर स्थलांतरितांना थेट कारागृहात न ठेवता या विशेष तात्पुरत्या केंद्रांमध्ये ठेवले जाईल. त्यानंतर त्यांची ओळख निश्चित करून कायदेशीर प्रक्रियेनुसार त्यांना त्यांच्या मूळ देशात परत पाठवले जाणार आहे.

प्रचारादरम्यान भाजपने अवैध घुसखोरी रोखण्याचे आणि बांगलादेशी-रोहिंग्या घुसखोरांविरोधात कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. सत्ता स्थापन झाल्यानंतर आता या आश्वासनांची अंमलबजावणी सुरू झाल्याची चर्चा रंगली आहे.

---

**भारतीयांविरोधातील वर्णद्वेषी वक्तव्यांवर रुबिओ यांची प्रतिक्रिया**

# जगातील प्रत्येक देशात काही मूर्ख लोक असतात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अमेरिकेत भारतीय आणि भारतीय वंशाच्या नागरिकांविरोधात वाढत असलेल्या वर्णद्वेषी वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनी महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे. "जगातील प्रत्येक देशात काही मूर्ख लोक असतात," असे स्पष्ट शब्दांत सांगत त्यांनी भारतीयांविरोधातील द्वेषपूर्ण आणि वर्णद्वेषी वक्तव्यांचा निषेध केला. एस. जयशंकर यांच्यासोबत नवी दिल्लीत झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत त्यांनी ही भूमिका मांडली.
भारत दौऱ्यावर असलेल्या रुबिओ यांना अमेरिकेत भारतीयांविरोधात सोशल मीडियावर आणि सार्वजनिक मंचांवर होत असलेल्या वर्णद्वेषी टिप्पण्यांबाबत प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना त्यांनी म्हटले की, "अशा टिप्पणींना आम्ही अत्यंत गंभीरतेने घेतो. अमेरिकेतही काही लोक मूर्खपणाच्या टिप्पणी करतात. मात्र, त्या संपूर्ण अमेरिकन समाजाचे प्रतिनिधित्व करत नाहीत."
रुबिओ यांनी अमेरिकेचे वर्णन "जगातील सर्वाधिक स्वागतशील देश" असे करत भारतीय समुदायाच्या योगदानाचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, विविध देशांतून आलेल्या लोकांनी अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला, तंत्रज्ञान क्षेत्राला आणि सामाजिक रचनेला बळकटी दिली आहे. भारतीय समुदायाने अमेरिकेतील उद्योग, संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रात मोठे योगदान दिल्याचेही त्यांनी नमूद केले.
पत्रकार परिषदेत अमेरिकेच्या नवीन व्हिसा आणि स्थलांतर धोरणांबाबतही चर्चा झाली. अमेरिकेतील एच-१बी व्हिसा शुल्कवाढ, ग्रीन कार्ड प्रक्रियेत बदल आणि स्थलांतर नियम कडक केल्यामुळे भारतात चिंता व्यक्त होत आहे. यावर प्रतिक्रिया देताना रुबिओ यांनी स्पष्ट केले की, अमेरिकेतील स्थलांतर सुधारणा या "भारतविरोधी" नसून जागतिक स्तरावर संपूर्ण व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याचा भाग आहेत.
ते म्हणाले की, "गेल्या काही वर्षांत अमेरिकेला मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर स्थलांतराचा सामना करावा लागला. त्यामुळे स्थलांतर प्रणालीत बदल करणे आवश्यक झाले आहे. या प्रक्रियेत काही अडचणी आणि तणाव निर्माण होऊ शकतात, पण दीर्घकालीन दृष्टीने ही व्यवस्था अधिक कार्यक्षम ठरेल."
दरम्यान, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी अमेरिकेसोबतच्या चर्चेत "कायदेशीर स्थलांतर आणि कौशल्याधारित गतिशीलतेवर परिणाम होऊ नये" ही भारताची भूमिका स्पष्टपणे मांडली. भारत-अमेरिका व्यापार, संशोधन आणि तंत्रज्ञान सहकार्याला भारतीय व्यावसायिकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.
मार्को रुबिओ यांच्या या वक्तव्याला भारतात मोठे महत्त्व दिले जात आहे. अलीकडच्या काळात अमेरिकेत भारतीय आणि दक्षिण आशियाई समुदायांविरोधात सोशल मीडियावर द्वेषपूर्ण मोहिमा आणि वर्णद्वेषी पोस्ट्स वाढल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकन प्रशासनाने प्रथमच इतक्या स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिल्याचे मानले जात आहे.

---

## इबोला संकटामुळे जागतिक आरोग्य आणीबाणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : इबोला विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) जागतिक आरोग्य आणीबाणी घोषित केली आहे. विशेषतः काँगो आणि युगांडामध्ये इबोलाचा उद्रेक गंभीर बनला असून, परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

डब्ल्यूएचओने स्पष्ट केले की, डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोमध्ये इबोलाच्या "बुंदिबुग्यो" प्रकाराचा फैलाव वेगाने होत आहे. या प्रकारासाठी अद्याप कोणतीही अधिकृत लस किंवा निश्चित उपचार उपलब्ध नसल्याने चिंता अधिक वाढली आहे. सध्या काँगोमध्ये इबोलाचे ८२ पुष्टी झालेले रुग्ण आढळले असून ७ जणांचा मृत्यू झाला आहे. याशिवाय शेकडो संशयित रुग्ण आणि मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे. युगांडामध्येही संसर्ग पोहोचला असून दोन रुग्ण आढळले आहेत.

डब्ल्यूएचओचे महासंचालक टेड्रोस अॅडनॉम घेब्रेयसस यांनी परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले. राष्ट्रीय स्तरावर धोका "अत्यंत उच्च", प्रादेशिक स्तरावर "उच्च" आणि जागतिक स्तरावर "कमी" असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. इबोला हा अत्यंत संसर्गजन्य आणि जीवघेणा विषाणूजन्य आजार मानला जातो. संक्रमित व्यक्तीच्या रक्त, उलटी, लाळ किंवा इतर शारीरिक द्रवांच्या संपर्कातून तो पसरतो. मात्र, कोविडप्रमाणे हवेतून पसरणारा विषाणू नसल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. या उद्रेकामुळे भारतासह अनेक देशांनी सतर्कता वाढवली आहे.

## संपादकीय

### होर्मुजचा फास!



**जागतिक व्यापार आणि ऊर्जा पुरवठ्याची जीवनवाहिनी असलेल्या 'होर्मुजच्या सामुद्रधुनी'वरील इराणने घट्ट केलेली पकड जागतिक अर्थव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा ठरत आहे. या सामरिक संघर्षाचे पडसाद आंतरराष्ट्रीय बाजारातील खनिज तेलाच्या किमतींवर होऊन भारतासारख्या आयातदार देशांपुढील आर्थिक आव्हाने प्रचंड वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.**

आंतरराष्ट्रीय भू-राजकारणातील संघर्षाचे केंद्र आता केवळ जमिनीपुरते मर्यादित न राहता समुद्रातील महत्त्वाच्या व्यापारी जलमार्गांपर्यंत विस्तारले आहे. मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, इराणने ओमान आणि संयुक्त अरब अमिरातीच्या दरम्यान असलेल्या 'होर्मुजच्या सामुद्रधुनी'वर आपले नियंत्रण अधिक आक्रमकपणे वाढवण्यास सुरुवात केली आहे. ही सामुद्रधुनी केवळ एक भौगोलिक जलमार्ग नाही, तर ती संपूर्ण जगाची ऊर्जेची भूक भागवणारी मुख्य धमनी आहे. या अरुंद जलमार्गावरून जगातील एकूण खनिज तेल पुरवठ्याचा तब्बल पाचवा हिस्सा वाहून नेला जातो. सौदी अरेबिया, इराक, यूएई, कुवेत आणि कतार यांसारख्या मोठ्या तेल उत्पादक देशांच्या निर्यातीचा हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे इराणने या मार्गावर घेतलेला आक्रमक पवित्रा आणि मालवाहू जहाजांची केलेली कोंडी हे जागतिक अर्थव्यवस्थेला ओलीस ठेवण्याचे एक धोकादायक धोरण आहे. इराणच्या या वाढत्या आक्रमकतेचे मूळ पाश्चिमात्य देशांशी, विशेषतः अमेरिकेशी असलेल्या त्याच्या दीर्घकालीन संघर्षात दडले आहे. इस्रायल-हमास संघर्षानंतर मध्यपूर्वेत निर्माण झालेल्या नव्या समीकरणांमुळे इराणने आपल्या सामरिक स्थानाचा वापर एक अस्त्र म्हणून करण्यास सुरुवात केली आहे. होर्मुजच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या पाश्चिमात्य देशांच्या किंवा इस्रायलशी संबंधित असलेल्या जहाजांना जप्त करणे, त्यांच्यावर ड्रोनद्वारे पाळत ठेवणे आणि नौदलाच्या माध्यमातून दबाव आणणे ही इराणची रणनीती बनली आहे. इराणने जर हा मार्ग पूर्णपणे बंद केला किंवा तिथली वाहतूक विस्कळीत केली, तर जागतिक स्तरावर ऊर्जेचे अभूतपूर्व संकट निर्माण होईल, याची पूर्ण जाणीव अमेरिकेसह सर्वच महासत्तांना आहे. या जागतिक संघर्षाची झळ भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेला सर्वांत आधी आणि तीव्रतेने बसू शकते. या मार्गावरील किंचितही तणाव किंवा वाहतुकीतील अडथळा थेट आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती भडकवण्यास कारणीभूत ठरतो. तेलाचे दर प्रति बॅरल काही डॉलर्सने जरी वाढले, तरी भारताचे आयातीचे बिल अब्जावधी रुपयांनी वाढते. याचा थेट परिणाम देशांतर्गत पातळीवर पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या किमती वाढण्यात होतो. इंधनाचे दर वाढल्याने वाहतूक खर्च वाढतो आणि परिणामी अन्नधान्यापासून ते जीवनावश्यक वस्तूंपर्यंत सर्वच गोष्टी महाग होऊन 'आयातित महागाई' देशात धडकते. तेलाच्या किमतींशिवाय या तणावाचा दुसरा मोठा फटका भारतीय निर्यातीला आणि जागतिक पुरवठा साखळीला बसत आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या जहाजांचा विमा खर्च कंपन्यांनी प्रचंड वाढवला आहे. जहाजांना आपला मार्ग बदलून लांबच्या अंतराने, म्हणजेच आफ्रिका खंडाला वळसा घालून प्रवास करावा लागत असल्यामुळे मालवाहतुकीचा खर्च आणि वेळ दोन्ही दुप्पट झाले आहेत. भारताची बासमती तांदूळ, चहा, रसायने आणि अभियांत्रिकी वस्तूंची मध्यपूर्वेतील देशांना होणारी निर्यात यामुळे महाग आणि पर्यायाने आंतरराष्ट्रीय बाजारात कमी स्पर्धात्मक बनत आहे. तसेच, लाखो भारतीय नागरिक मध्यपूर्वेतील देशांमध्ये नोकरीनिमित्त स्थायिक आहेत. तिथली असुरक्षितता आणि आर्थिक अस्थिरता या अनिवासी भारतीयांच्या रोजगारावर गदा आणू शकते. तात्कालिक उपाय म्हणून भारताला रशिया किंवा आफ्रिकन देशांसारख्या पर्यायी मार्गांवरून येणाऱ्या तेल पुरवठ्याचा वाटा वाढवावा लागेल. दीर्घकालीन पातळीवर भारताला आपल्या ऊर्जा सुरक्षेसाठी धोरणात्मक राखीव साठे वाढवावे लागतील, जेणेकरून संकटकाळात किमान काही महिने देशांतर्गत पुरवठा खंडित होणार नाही. यासोबतच, देशांतर्गत पातळीवर अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा विकास अधिक वेगाने करणे हाच शाश्वत मार्ग आहे. होर्मुजच्या सामुद्रधुनीभोवती आवळला जाणारा इराणचा हा फास संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेच्या गळ्याभोवतीचा फास बनत चालला आहे. अशा भू-राजकीय भूकंपाच्या काळात भारताला संतुलित राजनैतिक भूमिकेचा अवलंब करावा लागेल. इराण आणि अमेरिका या दोन्ही बाजूंशी असलेल्या चांगल्या संबंधांचा वापर करून भारताला स्वतःचे आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवावे लागतील. जागतिक ऊर्जेच्या या खेळात जी अर्थव्यवस्था स्वतःला लवचिक आणि आत्मनिर्भर बनवेल, तीच या वादळात टिकून राहील हाच धडा या निमित्ताने मिळतो आहे.

# 'अमर्याद' मैत्रीची नवी राजनैतिक आव्हाने



**» चीन आणि रशिया यांच्यातील 'अमर्याद भागीदारी' जागतिक सत्तासंतुलन बदलत असतानाच, या दोन्ही देशांमधील वाढती आर्थिक व सामरिक विसंगती भारतासारख्या देशांसाठी नव्या राजनैतिक आव्हानांची नांदी ठरत आहे.**

जागतिक भू-राजकारणात गेल्या काही वर्षांत वेगाने आकाराला आलेली चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांची मैत्री ही केवळ दोन नेत्यांमधील जवळीक नसून, तो पाश्चिमात्य देशांच्या वर्चस्वाला शह देण्याचा एक पद्धतशीर प्रयत्न आहे. युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर पाश्चिमात्य देशांनी रशियावर आर्थिक निर्बंध लादल्यापासून मॉस्को आणि बीजिंगमधील संबंध अधिकच घट्ट झाले आहेत. या दोन्ही नेत्यांनी घोषित केलेली 'अमर्याद भागीदारी' जागतिक समीकरणांना नवी दिशा देत आहे. मात्र, वरवर अत्यंत मजबूत वाटणाऱ्या या मैत्रीच्या आत एक मोठी विसंगती वेगाने निर्माण होत आहे, ज्याकडे जागतिक धोरणकर्त्यांना दुर्लक्ष करून चालणार नाही. हा नवा अक्ष एका बाजूला अमेरिकेच्या नेतृत्वाखालील जागतिक व्यवस्थेला थेट आव्हान देत असला, तरी या भागीदारीत आता चीन हा 'मोठ्या भावाच्या' भूमिकेत येत असून रशियाचे स्थान दुय्यम होत चालले आहे, हे उघड सत्य आहे.

या वाढत्या विसंगतीचे मुख्य कारण दोन्ही देशांच्या आर्थिक ताकदीमध्ये दडले आहे. युक्रेन संकटानंतर युरोपने रशियन ऊर्जा संसाधनांवर बंदी घातल्यामुळे रशियाला आपल्या खनिज तेल आणि नैसर्गिक वायूच्या विक्रीसाठी पूर्णपणे चीनच्या बाजारपेठेवर अवलंबून राहावे लागत आहे. रशिया आज चीनला सवलतीच्या दरात कच्च्या तेलाचा पुरवठा करणारा सर्वांत मोठा देश बनला आहे, तर दुसरीकडे पाश्चिमात्य तंत्रज्ञानापासून वंचित झालेल्या रशियन बाजारपेठेत चीनी इलेक्ट्रॉनिक्स, गाड्या आणि इतर यंत्रसामग्रीचा पूर आला आहे. रशियाचे हे वाढते आर्थिक परावलंबित्व बीजिंगला मॉस्कोवर राजकीय दबाव आणण्याची सुवर्णसंधी देत आहे. रशियासारखी महासत्ता, जिच्याकडे जगातील सर्वांत मोठा आण्विक साठा आहे, ती केवळ आर्थिक निकषांमुळे चीनची कनिष्ठ भागीदार बनत चालली आहे. ही परिस्थिती रशियाच्या जागतिक प्रतिष्ठेला धक्का देणारी असली, तरी सध्याच्या परिस्थितीत पुतिन यांच्याकडे दुसरा कोणताही प्रभावी पर्याय उरलेला नाही.

या भागीदारीकाचा थेट आणि दूरगामी परिणाम भारताच्या परराष्ट्र धोरणावर आणि राष्ट्रीय सुरक्षेवर होणार आहे, हाच या घडामोडींचा सर्वांत कळीचा मुद्दा आहे. रशिया हा भारताचा ऐतिहासिक आणि अत्यंत विश्वासू संरक्षण भागीदार राहिला आहे. आपल्या लष्करी सामग्रीपैकी मोठा हिस्सा आजही रशियन बनावटीचा आहे. दुसरीकडे, वास्तविक नियंत्रण रेषेवर चीनशी असलेला भारताचा सीमावाद जगजाहीर आहे. अशा परिस्थितीत, जर रशिया पूर्णपणे चीनच्या प्रभावाखाली गेला, तर संकटकाळात रशिया भारताची बाजू कितपत घेऊ शकेल, हा मोठा प्रश्न आहे. चीनच्या दबावापोटी रशिया भारताला होणारा लष्करी सुट्या भागांचा आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचा पुरवठा तर रोखणार नाही ना, अशी रास्त भीती भारतीय संरक्षण वर्तुळात व्यक्त केली जात आहे. भारताला आपल्या जुन्या मित्राला पूर्णपणे चीनच्या कुशीत जाण्यापासून रोखायचे आहे, पण त्याच वेळी रशियाच्या या बदलत्या भूमिकेमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांकडे डोळेझाक करून चालणार नाही.

या आव्हानाचा सामना करण्यासाठी भारताने आपल्या राजनैतिक धोरणात लवचिकता आणण्यास सुरुवात केली आहे. भारताने अमेरिकेच्या नेतृत्वाखालील 'क्वाड' सारख्या गटांमध्ये आपला सहभाग वाढवून इंडो-पॅसिफिक क्षेत्रात चीनला वेढण्याची रणनीती आखली आहे, तर दुसरीकडे रशियाशी असलेले संबंध तोडलेले नाहीत. पाश्चिमात्य देशांच्या दबावाला न बळी पडता भारताने रशियाकडून सवलतीच्या दरात तेल खरेदी सुरूच ठेवली आहे. ही भारताची राजनैतिक कसरत आगामी काळात अधिक कठीण होणार आहे. जर चीन-रशिया अक्ष अधिक आक्रमक झाला, तर भारताला आपली तटस्थतेची भूमिका सोडून अमेरिकेच्या गोटात अधिक स्पष्टपणे सामील व्हावे लागेल का, यावर विचार करावा लागेल.

शी-पुतिन यांची ही 'अमर्याद' मैत्री जागतिक पातळीवर शीतयुद्धासारखी नवीन द्विध्रुवीय व्यवस्था निर्माण करत आहे. या नव्या रचनेत भारताला स्वतःचे राष्ट्रीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी अतिशय चतुर धोरण अवलंबावे लागेल. संरक्षण क्षेत्रातील रशियावरील अवलंबित्व टप्प्याटप्प्याने कमी करत देशांतर्गत उत्पादनाला गती देणे आणि युरोपीय देशांशी आर्थिक संबंध अधिक दृढ करणे हाच भारतासाठी एकमेव शाश्वत मार्ग आहे.

भू-राजकीय भूकंपाच्या या काळात भारताला मैत्रीच्या जुन्या चौकटीबाहेर पडून अत्यंत व्यावहारिक आणि स्वदेशी हिताला प्राधान्य देणारे परराष्ट्र धोरण राबवावे लागेल, हाच या बदलत्या जागतिक समीकरणांचा मुख्य धडा आहे.

# पालखी सोहळा मार्ग व विसावा ठिकाणांची पाहणी

## सर्व विभागांनी समन्वयाने नियोजनात्मक काम करण्याच्या सूचना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आषाढीवारी पालखी सोहळ्यानिमित्त वारकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी. पालखी मुक्काम, विसावा तसेच पालखी मार्गांवरील आवश्यक सोयी-सुविधांचे प्रभावी नियोजन करून सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस प्रशासनाशी समन्वय ठेवून काम करावे, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.



संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या आषाढीवारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. याच अनुषंगाने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी निगडी येथील भक्ती-शक्ती चौक, आकुर्डी येथील मुक्काम स्थळ तसेच पालखी मार्गांची पाहणी केली. तसेच संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या मोशी येथील मॅगझीन चौकातील स्वागतस्थळ आणि महापालिका क्षेत्रातील पालखी मार्गांचाही आढावा घेतला. या पाहणी दौऱ्यात अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, मुख्य आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ओमप्रकाश बहिवाल आदी उपस्थित होते.

निगडी येथील भक्ती-शक्ती चौकात जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी उभारण्यात येणाऱ्या स्वागत कक्षाच्या जागेची आयुक्तांनी पाहणी केली. यावेळी मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, मनोज सेठिया, उपआयुक्त प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, निवेदिता घार्गे, कार्यकारी अभियंता अजय सूर्यवंशी, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, सहाय्यक आरोग्याधिकारी सीताराम गायकवाड तसेच पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपआयुक्त विवेक पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त सतीश नांदुरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक निता गायकवाड आणि महामेट्रोचे अधिकारी उपस्थित होते. यानंतर आयुक्तांनी आकुर्डी येथील संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या मुक्कामस्थळाची तसेच महापालिकेच्या मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू माध्यमिक विद्यालय येथील दिंडी मुक्काम स्थळाची पाहणी केली. यावेळी क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळासाहेब होडगर, कार्यकारी अभियंता वैशाली ननवरे आदी उपस्थित होते. पालखी सोहळा पावसाळ्याच्या कालावधीत होत असल्याने आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेली सर्व यंत्रणा सतर्क आणि सज्ज ठेवावी, अशा सूचना महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. शहरातील सर्व होर्डिंग्जची पाहणी करून धोकादायक अथवा नियमबाह्य होर्डिंग्जवर तात्काळ कारवाई करावी. तसेच पालखी मार्ग, विसावा ठिकाणे आणि पार्किंग परिसरात दर्शनी भागात दिशादर्शक फलक लावावेत, असे निर्देश त्यांनी दिले.

# नागरिकांनी गणनाकारांना आवश्यक माहिती द्यावी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील 'घरयादी आणि गृहगणना' प्रक्रिया सध्या सुरू असून, स्व-गणना पूर्ण केलेल्या नागरिकांनी त्यांना प्राप्त झालेला एसई आयडी संबंधित गणनाकारांना द्यावा, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

महापालिकेच्या माहितीनुसार, १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत नियुक्त गणनाकार नागरिकांच्या घरी भेट देणार आहेत. या भेटीदरम्यान स्व-गणनेत सादर केलेल्या माहितीची पडताळणी, पुष्टीकरण आणि अंतिम सादरीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी त्यांचा एसई आयडी गणनाकारांना उपलब्ध करून देणे बंधनकारक राहणार आहे. गणनाकारांकडून माहितीची पडताळणी आणि मान्यता झाल्यानंतरच 'घरयादी आणि गृहगणना' प्रक्रिया पूर्ण मानली जाणार आहे.

उपआयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी सांगितले की, स्व-गणना पोर्टलवर नागरिकांनी सादर केलेली माहिती एनक्रिप्टेड स्वरूपात सुरक्षित सरकारी सर्व्हरवर संग्रहित केली जात आहे. या प्रक्रियेसाठी अत्याधुनिक सायबर सुरक्षा आणि गोपनीयतेच्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

# लोकमान्य हॉस्पिटल कर्मचाऱ्यांचे तीव्र आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** चिंचवड येथील लोकमान्य हॉस्पिटल मधील सुमारे ४०० कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांनी थकीत वेतन आणि कोरोना काळातील मानधनाच्या मागणीसाठी आंदोलन छेडले आहे. गेल्या १० ते ११ महिन्यांपासून पगार न मिळाल्याने कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

आंदोलनस्थळी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष तथा कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी उपस्थित राहून हॉस्पिटल प्रशासनावर तीव्र टीका केली. यावेळी कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती बांधून निषेध नोंदवला.



कामगार नेते भोसले यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, व्ही. जी. वैद्य आणि एन. व्ही. वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली चालणारे ट्रस्टचे हे हॉस्पिटल नव्या व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात आले असून, ते सह्याद्री हॉस्पिटल्स समूहाने विकत घेतल्याची माहिती समोर येत आहे. हस्तांतरणानंतर नव्या व्यवस्थापनाने कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांऐवजी कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नेमण्याची भूमिका घेतल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

कोविड काळात जीव धोक्यात घालून सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना अचानक कामावरून दूर करण्यात आल्याचा दावा कामगारांनी केला. या प्रकरणी कामगार आयुक्त कार्यालय तसेच विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या उपस्थितीत अनेक बैठका झाल्याचे सांगण्यात आले. पोलिसांनीही मध्यस्थी करत किमान थकीत पगार देण्याची विनंती व्यवस्थापनाला केली होती, मात्र त्यातून कोणताही तोडगा निघालेला नाही, असा आरोप करण्यात आला. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, इंडस्ट्रियल कोर्टातही गेल्या अडीच वर्षांपासून प्रकरण प्रलंबित असून कामगारांना न्याय मिळत नसल्याची भावना आहे. व्यवस्थापनाचे प्रतिनिधी सुनील काळे यांनी पोलिसांसोबत झालेल्या चर्चेत सोमवारपर्यंत पगाराबाबत निर्णय कळवण्याचे आश्वासन दिल्याची माहिती आंदोलकांनी दिली.

कामगारांनी सह्याद्री समूहाचे अध्यक्ष चारू आपटे यांच्याकडून सकारात्मक हस्तक्षेपाची अपेक्षा व्यक्त केली आहे. दरम्यान, सोमवारपर्यंत थकीत वेतनाबाबत निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यशवंतभाऊ भोसले यांनी दिला आहे.

# थेरगावमध्ये कोयता गँगची दहशत; तरुणावर जीवघेणा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाअंतर्गत काळेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोयता गँगची दहशत पुन्हा समोर आली आहे. थेरगाव येथील जगतापनगर परिसरात तरुणांवर कोयत्याने हल्ला करून दहशत माजविणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना २१ मे रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास समर्थ क्लिनिकसमोर, जगतापनगर लेन क्रमांक ४ व ५ परिसरात घडली.

याप्रकरणी सौरभ विलास चौधरी (वय २४, व्यवसाय – सिक्युरिटी, रा. नीता जगताप यांची रूम, जगतापनगर लेन नं. ४, थेरगाव, पुणे) यांनी काळेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गौरव उर्फ नन्या गौतम वाघमारे (वय २२, रा. आनंदनगर झोपडपट्टी, चिंचवड) आणि रितेश क्षीरसागर (वय २१, रा. आनंदनगर झोपडपट्टी, चिंचवड) यांना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, फिर्यादी सौरभ चौधरी, आदित्य, दिवाकर, गौरव दत्ता लोंढे, ओमकार महादेव कुचेकर आणि विनायक अशोक थोरात हे सर्वजण जगतापनगर परिसरात गप्पा मारत उभे होते. त्यावेळी आरोपी एक्सेस दुचाकीवरून तेथे आले. आरोपींनी शिवीगाळ करत कमरेतील लोखंडी कोयता बाहेर काढला आणि सौरभ चौधरी यांच्या हातावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले. तसेच इतर साथीदारांवरही कोयत्याने वार करण्यात आले. हल्ल्यानंतर आरोपींनी "आम्ही पिंपरी-चिंचवडचे भाई आहोत, आमच्या नादाला कोणी लागू नये," अशी धमकी देत परिसरात दहशत निर्माण केली आणि तेथून पसार झाले.

या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश नलावडे करीत आहेत.

**कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाअंतर्गत दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्याच्या हद्दीत कामावर उशिरा आल्याच्या कारणावरून एका कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यात २२ मे २०२६ रोजी सकाळी १०.१८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी प्रवीण ज्ञानेश्वर बोबडे (वय ३४, व्यवसाय – नोकरी, रा. घारे यांची रूम, देहूगाव, ता. हवेली, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी योगेश चंद्रकांत माने याला अटक करण्यात आली आहे.

ही घटना २० मे रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास संदीप टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये घडली. फिर्यादी प्रवीण बोबडे यांच्या केबिनमध्ये आरोपी योगेश माने याने फिर्यादी कामावर उशिरा आल्यामुळे रागाच्या भरात त्यांच्या हातातील हातोड्याने तसेच लोखंडी रॉडने वार करून जखमी केले. या हल्ल्यात फिर्यादींना ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक जायभाये करीत आहेत.

**गावडे जलतरण तलाव बंद**

**चिंचवड :** चिंचवड येथील गावडे जलतरण तलाव एका दुर्दैवी घटनेनंतर गेल्या आठ दिवसांपासून बंद ठेवण्यात आल्याने ज्येष्ठ नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तलाव सुरू करण्यात आलेला नसल्याने "जलतरण तलाव नेमका कोणाच्या आदेशाने आणि का बंद ठेवला आहे?" असा सवाल नागरिक करत आहेत. सुमारे १०० ज्येष्ठ नागरिकांनी स्थानिक नगरसेवक सुरेश शिवाजी भोईर यांच्या कार्यालयासमोर एकत्र येत गावडे जलतरण तलाव तातडीने सुरू करण्याची मागणी केली. नगरसेवक भोईर यांनी आयुक्तांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. चर्चेदरम्यान आयुक्तांना तलाव बंद असल्याची माहितीच नसल्याचे समोर आल्याने नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले. संबंधित अधिकाऱ्यांनी मनमानी पद्धतीने तलाव बंद ठेवला का, तसेच अशा अधिकाऱ्यांवर महापालिका प्रशासन कारवाई करणार का, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

# ई-चलान अपडेट न झाल्याने वाहनचालकांना मनस्ताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या ई-चलान परिवहन पोर्टलवर वाहनांचा दंड ऑनलाइन भरल्यानंतरही तो अद्ययावत (अपडेट) होत नसल्याने वाहनचालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. दंड भरूनही तो प्रलंबित दाखवला जात असल्याने वाहन सोडवणे, वाहन मालकी हस्तांतरण, वाहनांचे पासिंग आदी कामे रखडली आहेत.

वाहनांचा अतिवेग, सीट बेल्ट न लावणे, लेन कटिंगसह विविध वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर आरटीओकडून ई-चलानद्वारे दंड आकारला जातो. तसेच वाहन तपासणीदरम्यान नियमभंग करणाऱ्या वाहनांवरही ऑनलाइन दंड आकारण्यात येतो.

स्पीडगनच्या माध्यमातून होणाऱ्या कारवाईची नोंद थेट ई-चलान परिवहन पोर्टलवर केली जाते. वाहनचालकांना याच पोर्टलवर ऑनलाइन दंड भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. मात्र, दंडाची रक्कम भरल्यानंतर संबंधित माहिती पोर्टलवर अद्ययावत होत नसल्याने दंड न भरल्याचेच दाखवले जात आहे.

या तांत्रिक अडचणीमुळे अनेक वाहनचालकांची आरटीओशी संबंधित कामे खोळंबली आहेत. पूर्वी दंड भरल्यानंतर त्याची नोंद तात्काळ परिवहन विभागाच्या संकेतस्थळांवर अद्ययावत होत होती.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### वीज पडून दोन बैल ठार

**अवसरी :** भीमाशंकर सहकारी साखर कारखाना स्थळानजीक शुक्रवारी (दि. २२) सायंकाळी वीज पडून ऊसतोड कामगारांचे दोन बैल जागीच मृत्युमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे संबंधित ऊसतोड कामगारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पारगाव परिसरात शुक्रवारी सायंकाळी सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पावसाला सुरुवात झाली होती. भीमाशंकर साखर कारखाना स्थळावर अहिल्यानगर जिल्ह्यातील हाकेवाडी, मोहसदेवडे येथील दादासाहेब बाबुराव चितळकर हे ऊसतोड कामगार वास्तव्यास आहेत. त्यांच्या राहत्या घराशेजारी अचानक वीज कोसळली. त्या ठिकाणी बांधून ठेवलेले दोन बैल विजेच्या तडाख्यात सापडून जागीच मृत्युमुखी पडले. या घटनेमुळे चितळकर कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले. घटनेची माहिती मिळताच भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, सेक्रेटरी रामनाथ हिंगे, मुख्य लेखापाल राजेश वाकचौरे तसेच वाहन विभाग प्रमुख किरण शिंदे यांनी घटनास्थळी भेट देऊन चितळकर कुटुंबियांची विचारपूस केली. पारगावचे ग्राममहसूल अधिकारी संतोष साळोखे आणि सुभाष पंडित यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

### गृहिणीची २० लाखांची फसवणूक

**लोणी काळभोर :** "पुणे मेट्रो कंपनीशी टायअप आहे... दरमहा २० टक्के परतावा मिळेल," असे आमिष दाखवत एका गृहिणीकडून तब्बल २० लाख रुपये उकळून फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार लोणी काळभोर परिसरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अतुल शामराव पवार आणि संतोष सुरेश काकडे अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पुनम प्रमोद पवार (वय ५०, सध्या रा. पिंपरी, पूर्वी रा. कुशलवाटिका सोसायटी, लोणी काळभोर) यांनी फिर्याद दिली आहे.

## चार हजारांहून अधिक भाविकांचा सहभाग

# इंद्रायणी स्वच्छता अभियान उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदी येथील इंद्रायणी नदी पात्रातील वाढते प्रदूषण आणि कचऱ्याचे साम्राज्य दूर करण्यासाठी विविध सेवाभावी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. नाणिज येथील मठाचे सद्गुरू नरेंद्र महाराज यांच्या भक्त, शिष्य परिवार आणि संप्रदायाच्या पुढाकारातून हे अभियान उत्साहात पार पडले.

जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनाखाली आयोजित या मोहिमेत मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह राज्यातील विविध भागांतून चार हजारांहून अधिक भाविक, साधक आणि संग्राम सैनिक सहभागी झाले. महिलांचाही सहभाग लक्षणीय होता.



अभियानाच्या प्रारंभी माऊलींच्या प्रतिमेचे तसेच इंद्रायणी नदीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर नदी पात्रातील कचरा, कपडे, जलपर्णी, लाकडी वस्तू, पुराच्या पाण्यात वाहून आलेली झाडे-झुडपे, काचा, निर्माल्य तसेच अस्थी विसर्जनासोबत सोडण्यात आलेल्या विविध वस्तू बाहेर काढण्यात आल्या. संकलित कचरा पुढील विल्हेवाटीसाठी आळंदी नगरपरिषदेकडे सुपूर्द करण्यात आला. या मोहिमेमुळे इंद्रायणी नदीचे पावित्र्य जपण्याबाबत जनजागृती झाली असून, स्वच्छतेच्या कार्यात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सेवा कार्यातून समाधान आणि आनंद मिळाल्याची भावना सहभागी सेवकांनी व्यक्त केली. या वेळी महापौर रवी लांडगे, आळंदी नगरपरिषद नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीचे विश्वस्त निलेश महाराज लोंढे कबीर, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, नमामी इंद्रायणी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत सहभागी सेवकांचा सन्मान केला.

आळंदी नगरपरिषदेकडून आरोग्य विभागातील यांत्रिक साधने उपलब्ध करून देण्यात आली. अखिल भारतीय संग्राम सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शेखर मानकर, सिद्धेश्वर कोळी, लेफ्टनंट जनरल पश्चिम महाराष्ट्र गणेश सस्ते आदींनी अभियान यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. संध्याकाळी इंद्रायणी नदी घाटावर दीपदान करण्यात आले. दीपोत्सवामुळे नदी परिसर उजळून निघाला असून, वातावरण भक्तिमय झाले होते.

## मंगळसूत्र लंपास करणाऱ्या दोघांना तीन वर्षांची शिक्षा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरूनगर :** "घरात आणि व्यवसायात बरकत येईल," असे सांगून पूजा करण्याच्या बहाण्याने महिलेचे मंगळसूत्र लंपास करणाऱ्या दोन अट्टल चोरट्यांना खेड येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. व्ही. उतकर यांनी प्रत्येकी तीन वर्षे साधा कारावास आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. हा निकाल शुक्रवारी (दि. २२) देण्यात आला.

अक्षय राजू शेरावत (वय २५, रा. हिंगणगाव, ता. हवेली) आणि ऋषी बुद्धिमान नानावत (वय २३, रा. अष्टापूर नाका, ता. हवेली) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत.

दक्षिण म्हाळुंगे, ता. खेड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खराबवाडी येथे राहणाऱ्या अलका भगवान चव्हाण यांचे बिरदवडी ते आंबेठाण चौकादरम्यान वडापाव सेंटर आहे. १४ मे २०२५ रोजी दुपारी भगवा गमछा घातलेले दोन जण दुचाकीवरून त्यांच्या दुकानात आले. वडापाव आणि सिगारेट घेण्याच्या बहाण्याने त्यांनी संवाद साधला. "आम्ही भगत आहोत. पूजा केल्यास व्यवसाय चांगला चालेल, घरात लक्ष्मी येईल आणि बरकत वाढेल," असे सांगून त्यांनी चव्हाण यांना पूजा करण्यासाठी नारळावर मंगळसूत्र ठेवण्यास सांगितले. सुरुवातीला त्यांनी नकार दिला; मात्र आरोपींनी बोलण्यात गुंतवून त्यांना तयार केले. चव्हाण यांनी सुमारे दीड तोळे सोन्याचे मंगळसूत्र नारळावर ठेवताच आरोपींनी संधी साधून ते हातोहात लंपास केले आणि दुचाकीवरून पसार झाले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर चव्हाण यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती.

या प्रकरणाचा खटला राजगुरूनगर (खेड) येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. व्ही. उतकर यांच्या न्यायालयात सुरू होता. सरकारी पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता ए. एस. चव्हाण यांनी सात साक्षीदार तपासले.

## अवकाळीचा गांजवेवाडीला फटका



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील गांजवेवाडी परिसरात शुक्रवारी (दि. २२) सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. कांदा, उन्हाळी बाजरी तसेच ऊस पिकांना या पावसाचा मोठा फटका बसल्याने शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

गांजवेवाडी येथील झांबरे मळ्यात शेतकरी राजेश पांडुरंग झांबरे यांच्या कांदा साठवणुकीच्या बराकीचे पत्रे जोरदार वाऱ्यामुळे उडून गेले. या बराकीत सुमारे ८०० कांद्याच्या पिशव्यांचा साठा करण्यात आला होता. अचानक झालेल्या पावसामुळे बराकीत पाणी शिरल्याने जवळपास २०० पिशव्या भिजल्या असल्याची माहिती राजेश झांबरे यांनी दिली. कांदा भिजल्याने त्याच्या दर्जावर परिणाम होऊन आर्थिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याचबरोबर गांजवेवाडी परिसरातील उन्हाळी बाजरी पिकालाही मोठा फटका बसला आहे. अनेक ठिकाणी काढणीपूर्व अवस्थेतील बाजरीचे पीक भुईसपाट झाले आहे. काही शेतकऱ्यांनी काढणी केलेली बाजरी शेतात वाळवण्यासाठी ठेवली होती; मात्र अचानक झालेल्या पावसामुळे ती पूर्णपणे भिजली असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. परिसरातील ऊस पिकावरही वादळी पावसाचा परिणाम झाला आहे. वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी उसाचे पीक जमीनदोस्त झाले असून उत्पादनात घट होण्याची भीती व्यक्त होत आहे.

अवकाळी पावसामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांसमोर नवीन संकट उभे राहिले आहे. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून शासनाने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## दगड खाणपट्टा बंद करण्याचा ग्रामसभेत निर्णय

### अवैध दगड वाहतूक आणि क्रशरला ग्रामस्थांचा कडाडून विरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव) येथे ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत अवैध दगड खाणपट्टा (क्रशर) आणि दगड वाहतुकीला तीव्र विरोध दर्शविला.

दगड खाण आणि अवैध वाहतूक तातडीने बंद करण्यात यावी, अन्यथा रस्ता रोको आणि गाव बंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला. यावेळी ग्रामसभेत दगड खाणपट्टा (क्रशर) बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ग्रामसभेदरम्यान खाण मालक आणि ग्रामस्थ यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. उपसरपंच राजेंद्र वाळुंज पाटील यांनी ग्रामपंचायत दगड खाणपट्टा आणि दगड वाहतूक पूर्णपणे बंद करण्यासाठी सहकार्य करेल, असे आश्वासन दिले.



यावेळी संबंधित खाण मालकाने आपली बाजू मांडताना सांगितले की, "मी शासनाला लाखो रुपयांची रॉयल्टी भरली आहे. ग्रामपंचायतीची परवानगी घेतल्यानंतरच दगड खाणपट्टा (क्रशर) सुरू केला असून त्यामध्ये लाखो रुपयांची गुंतवणूक केली आहे. दगड वाहतूकही नियमांनुसार सुरू आहे. उद्या ग्रामस्थांनी खाणपट्टा बंद केला तर होणाऱ्या नुकसानीला जबाबदार कोण?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यावर काही महिला ग्रामस्थ आक्रमक होत म्हणाल्या, "हा व्यवसाय सुरू करताना आम्हाला विचारले नव्हते. आता आम्ही हा व्यवसाय बंद करणार म्हणजे करणारच."

ग्रामसभेला महिला आणि ग्रामस्थांची लक्षणीय उपस्थिती होती. यावेळी माजी उपसरपंच प्रकाश गायकवाड यांनी सौर ऊर्जा योजनेसाठी लाभार्थ्यांनी नावनोंदणी करून अर्ज करावेत तसेच शासनाच्या सबसिडीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

दरम्यान, काही ग्रामस्थांनी संबंधित खाण मालक ग्रामस्थांना पैसे देऊन भूलवण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोपही केला.

## 'समर्थ फाउंडेशन'तर्फे पाणी टँकर सेवा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड तालुक्याच्या पूर्व भागात तीव्र उन्हाळ्यामुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा परिषदेचे गटनेते तथा खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. विजयसिंह शिंदे पाटील यांनी 'समर्थ फाउंडेशन'च्या माध्यमातून मोफत पाणी टँकर सेवा सुरू ठेवली आहे. गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे टंचाईग्रस्त गावांतील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दरवर्षी मार्च ते मे या कालावधीत खेड तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांमध्ये आणि वाड्या-वस्त्यांमध्ये भीषण पाणीटंचाई निर्माण होते. अवर्षणग्रस्त पट्ट्यात यंदाही विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडल्याने नागरिकांची पाण्यासाठी मोठी भटकंती सुरू झाली होती. ही परिस्थिती लक्षात घेऊन कोणतीही निवडणूक डोळ्यासमोर न ठेवता सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून




ॲड. विजयसिंह शिंदे पाटील यांनी 'समर्थ फाउंडेशन'च्या माध्यमातून टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा सुरू केला आहे.

गेल्या महिनाभरापासून हे टँकर पूर्व भागातील टंचाईग्रस्त गावांमध्ये दररोज फेऱ्या मारत असून, महिलांची पाण्यासाठी होणारी पायपीट थांबण्यास मदत झाली आहे. या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत असून, "राजकारण बाजूला ठेवून जनतेच्या प्रश्नासाठी काम करणारे नेतृत्व तालुक्याला लाभले आहे," अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या आहेत.

या उपक्रमाबाबत बोलताना ॲड. विजयसिंह शिंदे पाटील म्हणाले, "निवडणुका येतात आणि जातात; मात्र जनतेशी असलेले नाते कायम असते. पूर्व भागातील माता-भगिनींची पाण्यासाठी होणारी वणवण पाहवली नाही. जोपर्यंत पाऊस पडत नाही आणि पाणीप्रश्न सुटत नाही, तोपर्यंत समर्थ फाउंडेशनच्या वतीने ही मोफत टँकर सेवा सुरू राहील." या समाजोपयोगी उपक्रमामुळे खेडच्या पूर्व भागातील अनेक गावांना मोठा आधार मिळाला असून, शिंदे पाटील यांच्या या जनसेवेचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## जवळेत वृक्षारोपण उपक्रम उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील जवळे गावामध्ये डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंट येथील विद्यार्थ्यांच्या वतीने वृक्षारोपण आणि पर्यावरण जनजागृती उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पर्यावरण संवर्धन, हरित ग्राम संकल्पना बळकट करणे तसेच भविष्यातील पिढ्यांसाठी स्वच्छ आणि निरोगी वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. एम. डी. जगताप, समन्वयक प्रा. एस. एन. पाटील तसेच एबीएस अधिकारी प्रा. वैशाली घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी गाव परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली. विद्यार्थ्यांनी वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व, जलसंधारणातील योगदान तसेच हवामान बदल रोखण्यासाठी वृक्षसंवर्धनाची गरज याबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली.

या उपक्रमासाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच वृषाली उत्तम शिंदे पाटील, तसेच हरिश्चंद्र शिंदे आणि चेतन बेंढारी यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत गावातील शाळा परिसर, अंगणवाडी आणि इतर ठिकाणी वृक्षलागवडीसाठी मदत केली. ग्रामस्थांनीही सक्रिय सहभाग घेत उपक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. यामध्ये जालिंदर लायगुडे, रघुनाथ सोनवणे, मारुती शिंदे, अशोक लोखंडे, यश वाळुंज आणि शशीकला गावडे यांचा सहभाग होता. या उपक्रमामध्ये प्रिया घाटोळ, श्रुतिका जाधव, अनुष्का हांडे, सोनिया दुधगावकर, राजनंदिनी वागज, तनिषा फुलसुंदर आणि सुहानी मोरे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

## शिंगवे परिसरात चारा पिकांचे मोठे नुकसान



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील शिंगवे परिसरात शुक्रवारी (दि. २२) सायंकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार मान्सूनपूर्व पावसामुळे जनावरांच्या चारा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या पावसामुळे अनेक शेतांतील मका, कडवळ आणि घासाची पिके जमीनदोस्त झाली असून शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिंगवे गावातील गोरडे मळा परिसरात शेतकरी बाबाजी कुशाबा गोरडे यांच्या शेतातील मका, कडवळ आणि घासाची पिके पूर्णपणे भुईसपाट झाली आहेत. जोरदार वाऱ्यामुळे उभी असलेली पिके आडवी पडली असून त्यामध्ये पाणी साचले आहे. त्यामुळे ही पिके काळी पडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. सध्या पशुपालक शेतकरी मोठ्या प्रमाणावर जनावरांसाठी हिरव्या चाऱ्यावर अवलंबून आहेत. मात्र अचानक झालेल्या पावसामुळे चारा पिकांचे नुकसान झाल्याने पुढील काही दिवसांत जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आधीच उन्हाळ्यामुळे अनेक भागांत चाऱ्याची टंचाई जाणवत असताना या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

शिंगवे परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी मेहनत घेऊन चारा पिकांची लागवड केली होती. मात्र निसर्गाच्या अवकृपेने काही तासांतच पिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करून प्रशासनाने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## अवकाळीमुळे तरकारी मालाची आवक कमी; १३ कोटी २० लाख रुपयांची उलाढाल

# चाकणला कांद्याच्या आवकेत मोठी घसरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा परिणाम बाजारावर दिसून आला असून तरकारी मालाच्या आवकेत घट झाली आहे. विशेषतः कांद्याच्या आवकेत मोठी घसरण झाली आहे. दुसरीकडे बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शेळ्या-मेंढ्या व बोकड बाजारात मोठी उलाढाल झाली. बाजाराची एकूण उलाढाल १३ कोटी २० लाख रुपये झाली.



चाकण बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार क्विंटल झाली असून कांद्याला ७०० ते १,३०० रुपये भाव मिळाला. बटाट्याची १,४०० क्विंटल आवक झाली असून त्याला ९०० ते १,४०० रुपये भाव मिळाला. लसणाची २५ क्विंटल आवक झाली असून लसणाला १० हजार रुपये कमाल भाव मिळाला.

हिरव्या मिरचीची ३६५ क्विंटल आवक झाली असून तिला ३ हजार ते ४ हजार रुपये भाव मिळाला.

कांद्याला भाव क्रमांक १ साठी १,३०० रुपये, भाव क्रमांक २ साठी १,१०० रुपये आणि भाव क्रमांक ३ साठी ७०० रुपये दर मिळाला. बटाट्याला भाव क्रमांक १ साठी १,४०० रुपये, भाव क्रमांक २ साठी १,००० रुपये तर भाव क्रमांक ३ साठी ९०० रुपये दर मिळाला.

फळभाज्यांच्या बाजारात टोमॅटोची ३०६ क्विंटल आवक झाली असून प्रति १० किलोला १,४०० ते २,००० रुपये भाव मिळाला. कोबीला ६०० ते १,००० रुपये, फ्लॉवरला १,००० ते १,५०० रुपये, वांग्याला १,५०० ते २,५०० रुपये, भेंडीला २,५०० ते ३,५०० रुपये, दोडक्याला २,५०० ते ३,५०० रुपये, कारल्याला ३,००० ते ४,००० रुपये, दुधीभोपळ्याला १,००० ते २,००० रुपये, काकडीला १,५०० ते २,५०० रुपये भाव मिळाला.

फरशीला ८,००० ते १०,००० रुपये, वालवडला ५,००० ते ७,००० रुपये, ढोबळी मिरचीला ६,००० ते ७,००० रुपये, चवळीला १,००० ते ३,५०० रुपये, वाटाण्याला ६,००० ते ८,००० रुपये, शेवग्याला १,५०० ते २,५०० रुपये, गाजराला १,००० ते २,००० रुपये, गवारीला २,५०० ते ४,००० रुपये तर आल्याला ४,००० ते ५,००० रुपये भाव मिळाला.

पालेभाज्यांच्या बाजारात मेथीच्या ९ हजार १२० जुड्यांची आवक झाली असून तिला १,५०० ते २,२०० रुपये भाव मिळाला. कोथिंबिरीच्या १९ हजार ९८० जुड्यांना १,००० ते १,८०० रुपये, शेपूस १,२०० ते १,६०० रुपये तर पालकाला १,००० ते १,५०० रुपये भाव मिळाला.

## शेतमजुराचा मुलगा झाला पोलीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी :** चाळकवाडी येथे शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबातील युवकाने कष्ट आणि जिद्दीच्या बळावर पोलीस दलात प्रवेश मिळवला आहे. बाळासाहेब नवनाथ आटपाळे यांची पोलीस दलात नियुक्ती झाल्याने परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे.

आटपाळे कुटुंब मूळचे बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील आहे. सुमारे १५ ते २० वर्षांपूर्वी उदरनिर्वाहासाठी नवनाथ आटपाळे आणि रंजना आटपाळे हे दाम्पत्य जुन्नर तालुक्यातील चाळकवाडी येथे स्थायिक झाले. सुरुवातीच्या काळात त्यांनी ऊस लागवडीसह विविध शेतीकामे करून कुटुंबाचा सांभाळ केला. वेळप्रसंगी शेतमजुरी तसेच काही शेतकऱ्यांची शेती अर्ध्या वाट्याने करून त्यांनी आपल्या अमित, बाळासाहेब आणि कविता या तिन्ही मुलांना शिक्षण दिले.

बाळासाहेब आटपाळे यांनी चाळकवाडी येथील शिवांजली विद्यानिकेतनमध्ये दहावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर आळे येथील ज्ञानमंदिर कॉलेजमधून बारावी शिक्षण पूर्ण केले. पोलीस भरतीची तयारी करण्यासाठी त्यांनी आळेफाटा येथील अकॅडमीत प्रवेश घेतला. मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर त्यांनी पोलीस भरती परीक्षा उत्तीर्ण केली. गरीब कुटुंबातून पुढे येत मिळवलेल्या या यशाबद्दल जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी बाळासाहेब आटपाळे यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## सारांश वृत्त

### काटेरी तारेत अडकून बिबट्याचा मृत्यू

**बलरामपूर (उत्तर प्रदेश):** येथील सोहेलवा वनक्षेत्रातील बंकटवा रेंजमध्ये रविवारी काटेरी तारेत अडकून एका तीन वर्षांच्या मादी बिबट्याचा मृत्यू झाल्याची माहिती एका अधिकाऱ्याने दिली. बंकटवा रेंजमधील आंब्याच्या बागेत एका वाघाची मान काटेरी तारेच्या कुंपणात अडकल्याची माहिती मिळाली. वन विभागाचे एक पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि त्यांना काटेरी तारेत अडकलेला बिबट्याचा मृतदेह आढळला.

### डेहराडूनमध्ये १०३ होमस्टेची नोंदणी रद्द

**डेहराडून** : व्यापक तपासणीत सुरक्षा नियमांचे आणि कार्यप्रणाली मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन झाल्याचे उघडकीस आल्यानंतर, डेहराडून जिल्हा प्रशासनाने रविवारी १०३ होमस्टेची नोंदणी रद्द केली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. 'ऑपरेशन सफाई' अंतर्गत पाच दंडाधिकारी पथकांनी उत्तराखंड होमस्टे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांना लक्ष्य करून जिल्हाभरातील १५३ होमस्टेची तपासणी केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले. पहिल्या टप्प्यात १७, दुसऱ्या टप्प्यात ७९ आणि तिसऱ्या टप्प्यात सात नोंदण्या रद्द केल्या. अधिकृत पर्यटन वेबसाइटवरून मालमत्ता काढून टाकण्याची प्रक्रियाही सुरू केली आहे.

### दिल्ली पोलिसांकडून शार्पशूटरना अटक

**नवी दिल्ली** : दिल्ली पोलिसांच्या पथकाने कपिल संगवान उर्फ नंदू टोळीच्या तीन शार्पशूटरसह दोन संशयित शस्त्र पुरवठादारांना अटक केली असून, दक्षिण-पश्चिम दिल्लीतील खंडणी रॅकेटशी संबंधित नियोजित गोळीबाराची घटना उधळून लावली आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. तुरुंगात असलेल्या गुंड कपिल संगवान उर्फ नंदूच्या सांगण्यावरून, खंडणीसाठी मालकाला धमकावण्याकरिता छावला येथील एका क्लिनिकमध्ये गोळीबार करण्याचे काम आरोपीला सोपवण्यात आले होते. आरोपीकडून तीन सेमी-ऑटोमॅटिक पिस्तूल जप्त करण्यात आली.

### पाकचे २४ सैनिक ठार, ५० हून अधिक जखमी

# बलुचिस्तानमध्ये ट्रेनवर आत्मघाती हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पाकिस्तानच्या अशांत नैऋत्येकडील बलुचिस्तान प्रांतात रविवारी लष्करी जवानांना घेऊन जाणाऱ्या ट्रेनला लक्ष्य करून भीषण स्फोट घडवून आणण्यात आला. या हल्ल्यात किमान २४ जण ठार झाले असून ५० हून अधिक जण जखमी झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.



हा हल्ला प्रांतीय राजधानी क्वेट्टा येथे झाला. लष्करी जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांना घेऊन जाणारी ट्रेन क्वेट्टाहून पेशावर येथे जात होती. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ट्रेन चमन पट्टक परिसरातील सिग्नलजवळून जात असताना स्फोटकांनी भरलेल्या वाहनाने ट्रेनच्या एका डब्याला धडक दिली आणि त्यानंतर मोठा स्फोट झाला.

मंगळवारपासून सुरू होणाऱ्या ईदच्या सुट्टीनिमित्त अनेक जवान आपल्या गावी जात होते. स्फोट इतका भीषण होता की ट्रेनचा एक डबा रुळावरून घसरून एका बाजूला कलंडला. घटनास्थळी बचावकार्य सुरू असून जखमींना रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोट झालेला परिसर सहसा सुरक्षा दलांच्या तैनातीसाठी ओळखला जातो. स्फोटामुळे जवळील इमारतींचे मोठे नुकसान झाले असून रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या अनेक वाहनांची तोडफोड झाली.

बलुचिस्तान सरकारचे अधिकारी बाबर युसुफझाई यांनी सांगितले की, स्फोटाच्या कारणांचा तपास सुरू आहे. या हल्ल्याची जबाबदारी अद्याप कोणत्याही संघटनेने स्वीकारलेली नसली तरी संशयाची सुई बंदी घातलेल्या बलुच लिबरेशन आर्मी (बीएलए) या फुटीरतावादी संघटनेकडे वळली आहे.

तेल आणि खनिज संपत्तीने समृद्ध असलेला बलुचिस्तान प्रांत गेल्या अनेक वर्षांपासून कमी तीव्रतेच्या बंडखोरीचा सामना करत आहे. बीएलएसारख्या संघटना पाकिस्तानच्या केंद्र सरकारपासून स्वातंत्र्याची मागणी करत असून त्यांनी यापूर्वीही सुरक्षा दल, सरकारी आस्थापने आणि नागरिकांवर हल्ले केले आहेत. २०२४ मध्येही बलुचिस्तानमधील एका रेल्वे स्थानकावर झालेल्या आत्मघाती हल्ल्यात सैनिकांसह किमान २६ जणांचा मृत्यू झाला होता.

## इराण-अमेरिका शांतता करार लवकरच शक्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : मार्को रुबियो यांनी रविवारी इराणसोबतच्या संभाव्य शांतता कराराबाबत मोठे संकेत दिले असून, येत्या काही तासांत महत्त्वपूर्ण घोषणा होऊ शकते, असे म्हटले आहे. या करारामुळे पश्चिम आशियातील तणाव आणि युद्धजन्य परिस्थिती औपचारिकपणे संपुष्टात येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

भारताच्या दौऱ्यावर आलेल्या रुबियो यांनी नवी दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, "येत्या काही तासांत जगाला चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे."

त्यांच्या मते, या संभाव्य करारामुळे होर्मुझची सामुद्रधुनी संदर्भातील अमेरिकेच्या सुरक्षाविषयक चिंता कमी होऊ शकतात. इराणने अमेरिका-इस्रायल कारवाईला प्रत्युत्तर म्हणून या सामुद्रधुनीवरील हालचालींवर मोठ्या प्रमाणात निर्बंध आणले होते.

रुबियो म्हणाले की, "हा करार अशा प्रक्रियेला सुरुवात करू शकतो ज्यामुळे भविष्यात जगाला इराणच्या संभाव्य अण्वस्त्र कार्यक्रमाबाबत भीती बाळगण्याची गरज उरणार नाही."

दरम्यान, ट्रम्प यांनीही पोस्ट करत "अमेरिका, इराण आणि इतर काही देशांदरम्यान करारावर मोठ्या प्रमाणात वाटाघाटी पूर्ण झाल्या असून अंतिम प्रक्रिया सुरू आहे," असे म्हटले आहे.

शनिवारीही रुबियो यांनी अमेरिकेची भूमिका स्पष्ट करताना सांगितले होते की, इराणला कोणत्याही परिस्थितीत अण्वस्त्रे विकसित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. त्यांनी सांगितले की, संभाव्य करारामध्ये इराणच्या उच्च संवर्धित युरेनियम साठ्यावर निर्बंध, अणु संवर्धन प्रक्रियेवर नियंत्रण आणि प्रादेशिक सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांचा समावेश असेल. "होर्मुझची सामुद्रधुनी कोणत्याही शुल्काशिवाय खुली राहिली पाहिजे. इराणने उच्च संवर्धित युरेनियम सुपूर्द केले पाहिजे आणि संवर्धनाच्या मुद्द्यावर तोडगा निघणे आवश्यक आहे," असे रुबियो यांनी स्पष्ट केले.

## बनावट चलन रॅकेटचा सूत्रधार अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाटणा** : बिहार पोलिसांच्या विशेष कृती दलाने (एसटीएफ) आणि लष्करी गुप्तचर विभागाच्या संयुक्त कारवाईत भारत-नेपाळ सीमेजवळ बनावट भारतीय चलन रॅकेटचा कथित सूत्रधार दया तिवारी उर्फ सुशील तिवारी याला रविवारी अटक केली. आरोपीला सीतामढी जिल्ह्यात भारत-नेपाळ सीमेवरून ताब्यात घेण्यात आले.

लष्करी गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे एसटीएफ आणि पूर्व चंपारण पोलिसांच्या संयुक्त पथकाने विविध ठिकाणी छापे टाकून ही कारवाई केली. आरोपी दया तिवारी हा बनावट भारतीय चलनी नोटा छापून त्या आपल्या एजंटांमार्फत बाजारात पुरवत असल्याचा आरोप आहे. ३१ जानेवारी रोजी हरैया पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यानंतर तो फरार होता. यापूर्वी पोलिसांनी त्याच्या आठ साथीदारांना अटक केली होती.

कारवाईदरम्यान आरोपीकडून १८,५०० रुपयांच्या बनावट भारतीय नोटा तसेच सुमारे २५ लाख रुपये किमतीचे नेपाळी चलन जप्त करण्यात आले. याशिवाय बनावट नोटा तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी रसायनेही पोलिसांनी हस्तगत केली आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी आरोपीची पोलीस कोठडी मागितली जाणार आहे.

या रॅकेटचे संबंध नेपाळ आणि बांगलादेशमार्गे कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय बनावट चलन नेटवर्कशी आहेत. भारत-नेपाळ सीमा केवळ अवैध घुसखोरीसाठीच नव्हे, तर बनावट चलन, शस्त्रास्त्रांची तस्करी आणि दहशतवादी कारवायांसाठीही वापरली जात असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. यापूर्वीही मधुबनी जिल्ह्यातून मोहम्मद अब्दुल इनाम नावाच्या आरोपीला अटक करण्यात आली होती. त्याचे संबंध पाकिस्तानस्थित बनावट भारतीय चलन नेटवर्कशी असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता.

## दहशतवाद्यांच्या शोधासाठी मोहीम तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर** : जम्मू आणि काश्मीर मधील राजौरी जिल्ह्यात लपून बसलेल्या संशयित दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षा दलांनी रविवारी व्यापक शोधमोहीम अधिक तीव्र केली आहे. परिसरात नाकाबंदी कडक करण्यात आली असून अतिरिक्त सैन्य तैनात करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



शनिवारी गुप्त माहितीच्या आधारे डोरिमल-गंभीर मोगला परिसरात संयुक्त कारवाई करण्यात आली होती. या वेळी सुरक्षा दल आणि संशयित दहशतवाद्यांमध्ये अल्पकाळ चकमक झाली होती. त्यानंतर संपूर्ण जंगल परिसरात शोधमोहीम वाढविण्यात आली आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, "दोरिमल-गंभीर मोगला भागात शोधमोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून नाकाबंदीही मजबूत करण्यात आली आहे." संशयित दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी अतिरिक्त सुरक्षा कर्मचारी तातडीने घटनास्थळी पाठविण्यात आले आहेत.

संशयितांच्या हालचालींबाबत मिळालेल्या विशिष्ट गुप्त माहितीच्या आधारे भारतीय लष्कर, जम्मू आणि काश्मीर पोलीस आणि केंद्रीय राखीव पोलीस दल (सीआरपीएफ) यांच्या संयुक्त पथकाने शनिवारी मोठी घेराबंदी आणि शोधमोहीम सुरू केली होती.

सुरक्षा दलांचा संशयितांशी संपर्क झाल्यानंतर काही वेळ गोळीबार झाला. त्यानंतर दहशतवादी जंगलाच्या दिशेने पसार झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून संपूर्ण भागात कसून तपास सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, त्या परिसरात दोन ते तीन दहशतवादी लपून बसल्याची शक्यता आहे. अखनूर येथील गुढा ब्राह्मणा परिसरातही संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोधमोहीम सुरू केली आहे.

एका स्थानिक महिलेने तिच्या घराजवळ तीन ते चार मुखवटाधारी व्यक्ती संशयास्पद हालचाली करत असल्याचे पाहिल्यानंतर सुरक्षा यंत्रणांना माहिती दिली. त्यानंतर सुरक्षा दलांनी तातडीने परिसरात धाव घेत जवळची गावे सील केली आणि संशयितांचा शोध सुरू केला.

## सीबीएसईने दिला विद्यार्थ्यांना शुल्क दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) ने इयत्ता १२वीच्या निकालानंतरच्या पुनर्मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान तांत्रिक बिघाडामुळे विद्यार्थ्यांकडून जादा आकारलेले शुल्क परत करण्याची घोषणा केली आहे.

पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत विद्यार्थ्यांना आलेल्या तांत्रिक अडचणी, सर्व्हर डाऊनटाईम आणि पेमेंट गेटवेतील त्रुटींविषयी तक्रारी वाढल्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी सीबीएसईकडून सविस्तर अहवाल मागवला होता. त्यानंतर अवघ्या एका दिवसात मंडळाने हा निर्णय जाहीर केला.

सीबीएसईने जारी केलेल्या सूचनेनुसार, २१ आणि २२ मे रोजी तपासलेल्या उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रतींसाठी अर्ज करताना काही विद्यार्थ्यांकडून चुकीच्या पद्धतीने शुल्क आकारले गेले.

मंडळाने स्पष्ट केले की, काही विद्यार्थ्यांकडून जास्त रक्कम कपात झाली, तर काहींकडून कमी शुल्क आकारले गेले. ज्या विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त पैसे आकारले गेले आहेत, त्यांना ती रक्कम त्यांनी वापरलेल्या त्याच पेमेंट पद्धतीद्वारे परत केली जाणार आहे. तसेच, ज्या विद्यार्थ्यांकडून कमी शुल्क आकारले गेले आहे, त्यांना उर्वरित रक्कम भरण्याबाबत स्वतंत्रपणे माहिती दिली जाईल, असेही सीबीएसईने म्हटले आहे.

महत्त्वाचे म्हणजे, या सर्व प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांना पुन्हा अर्ज करण्याची गरज भासणार नाही. त्यांना त्यांच्या तपासलेल्या उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रती उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

"सत्यापन आणि पुनर्मूल्यांकन प्रक्रियेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या खऱ्या समस्यांचे निष्पक्ष आणि व्यवस्थित निराकरण करणे हा आहे," असे सीबीएसईने स्पष्ट केले आहे.

### केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी मागवला सविस्तर अहवाल

## पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत तांत्रिक अडचणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सीबीएसईच्या पुनर्मूल्यांकन प्रक्रियेदरम्यान उद्भवलेल्या तांत्रिक अडचणींची गंभीर दखल घेत केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडून (केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ) सविस्तर अहवाल मागवला आहे.



विद्यार्थी आणि पालकांकडून सर्व्हर डाऊनटाईम, पेमेंट गेटवेतील बिघाड, पोर्टलवरील तांत्रिक त्रुटी आणि पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत अडथळे येत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, मंत्र्यांनी तांत्रिक बिघाडामागील कारणे, पूर्वतयारीतील त्रुटी, तसेच प्रक्रिया व्यवस्थापनात सहभागी असलेल्या यंत्रणांची जबाबदारी निश्चित करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत.

दरम्यान, सीबीएसईने निवेदन जारी करत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण करण्यास मंडळ कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले आहे. यावर्षी ऑन-स्क्रीन मार्किंग प्रणालीअंतर्गत ९८.६ लाखांहून अधिक उत्तरपत्रिका तपासण्यात आल्याची माहिती मंडळाने दिली.

विद्यार्थ्यांना तपासलेल्या उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रती उपलब्ध करून देण्यात आल्या असून त्यानंतर पडताळणी आणि पुनर्मूल्यांकन प्रक्रिया राबविण्यात आली. मात्र, या सुविधेला अपेक्षेपेक्षा मोठा प्रतिसाद मिळाल्याने पोर्टलवर तांत्रिक ताण निर्माण झाला. काही विद्यार्थ्यांनी स्कॅन प्रती अस्पष्ट दिसणे, काही पाने गायब असणे, पेमेंटची पुष्टी उशिरा मिळणे, तसेच न तपासलेली किंवा चुकीची तपासलेली उत्तरे यांसारख्या समस्यांबाबत तक्रारी केल्या आहेत. सीबीएसईने सांगितले की, सर्व तक्रारींवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून मुदतवाढ आणि तांत्रिक सुधारणा यांसारख्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांनी घाबरून न जाता प्रक्रियेवर विश्वास ठेवावा, असे आवाहन मंडळाने केले आहे. पोर्टलवरील वाढत्या गर्दीमुळे निर्माण झालेल्या अडचणी लक्षात घेऊन अर्ज करण्याची अंतिम मुदत २४ मेपर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच, शेवटची स्कॅन प्रत पाठवल्यानंतर पुनर्मूल्यांकनासाठीचे पोर्टल आणखी दोन दिवस सुरू ठेवण्यात येणार असल्याचे मंडळाने स्पष्ट केले.

यंदा सीबीएसईने शुल्क रचनेतही मोठा बदल केला आहे. उत्तरपत्रिकांच्या स्कॅन प्रतींसाठी पूर्वीच्या ७०० रुपयांऐवजी आता १०० रुपये शुल्क आकारले जात आहे. उत्तरपत्रिका पडताळणीचे शुल्कही ५०० रुपयांवरून १०० रुपये करण्यात आले असून पुनर्मूल्यांकनासाठी प्रति प्रश्न २५ रुपये आकारले जाणार आहेत.

## लाल किल्ला बॉम्बस्फोट प्रकरणात एआयचा वापर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) च्या तपासात दिल्लीतील लाल किल्ला परिसरातील कार बॉम्बस्फोट प्रकरणात आरोपींनी "दहशतवादी कारवायांसाठी" आर्टिफिशियल इंटेलिजन्स एआय प्लॅटफॉर्मचा वापर केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणातील आरोपींचा संबंध अल-कायदाच्या भारतीय उपखंडातील शाखेशी असल्याचे तपासातून उघड झाले आहे.

एनआयएने १४ मे रोजी दिल्लीतील विशेष न्यायालयात सुमारे ७,५०० पानांचे आरोपपत्र दाखल केले. या आरोपपत्रात आयईडी तयार करण्यासाठी आरोपींनी वापरलेल्या अत्यंत नियोजनबद्ध आणि तांत्रिक पद्धतींचा तपशील नमूद करण्यात आला आहे. तपासानुसार, आरोपी जसीर बिलाल वानी हा अन्सार गझवत-उल-हिंद या दहशतवादी मॉड्यूलचा "इन-हाउस इंजिनिअर" म्हणून कार्यरत होता. या संघटनेचा संबंध अल-कायदा इन इंडियन सबकॉन्टिनेंट शी असल्याचे सांगण्यात आले आहे.

माध्यमातील वृत्तानुसार, आरोपींनी काझीगुंड येथील जंगल परिसरात रॉकेट-आधारित आयईडी तयार करून त्यांची चाचणीही केली होती. तसेच, सिलेंडर-आधारित आयईडीची चाचणी मट्टन जवळील युशमुर्ग जंगलात करण्यात आल्याचे आरोपपत्रात नमूद आहे. तपासादरम्यान आरोपी जसीर वानीने "रॉकेट कसे तयार करायचे" आणि "रासायनिक मिश्रणाचे प्रमाण काय असावे" यासाठी यूट्यूब आणि एआयचा वापर केल्याचा दावा एनआयएने केला आहे. या माध्यमांतून मिळालेल्या माहितीद्वारे आयईडी विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे आरोपपत्रात म्हटले आहे. या प्रकरणात काही वैद्यकीय व्यावसायिकांचाही सहभाग असल्याचे समोर आले आहे. आरोपी डॉ. उमर उन नबी, डॉ. आदिल अहमद राथर आणि डॉ. मुजम्मिल शकील यांनी स्फोटक साहित्य, तांत्रिक मार्गदर्शन आणि ड्रोन तंत्रज्ञानासंदर्भात मदत केल्याचा आरोप आहे.

तपासात असेही उघड झाले की, ड्रोनच्या सहाय्याने स्फोटके वाहून नेऊन सुरक्षा आस्थापनांवर हल्ले करण्याचा कट आखण्यात आला होता.

### राहुल गांधींचे अराजकतेचे प्रयत्न

**नवी दिल्ली** : भाजपने काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर देशात "अराजकता निर्माण करून" मोदी सरकारला अस्थिर करण्याचा कट रचल्याचा आरोप केला असून, ते परकीय शक्तींच्या सांगण्यावरून काम करत असल्याचाही दावा केला आहे. अनेक भाजप नेत्यांनी असा दावा केला आहे की, राहुल यांनी काँग्रेसच्या अल्पसंख्याक विभागाच्या सल्लागार परिषदेच्या बैठकीत मोदी सरकार एका वर्षाच्या आत पडेल असे म्हटल्यानंतर गांधींचा "प्लॅन" उघड झाला आहे.

## नीट परीक्षार्थी १८ वर्षीय तरुणीची आत्महत्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बेंगळुरू** : कलबुर्गी येथे नीट परीक्षा दिलेल्या १८ वर्षीय तरुणीने राहत्या घरी आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. मृत तरुणीचे नाव भाग्यश्री असे असून ती अभ्यासात अत्यंत हुशार होती, अशी माहिती तिच्या कुटुंबीयांनी दिली.

भाग्यश्रीने पीयूसी परीक्षेत ९२ टक्के गुण मिळवले होते. तिचे वडील राजशेखर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, "आमच्या कुटुंबात कोणतीही अडचण किंवा तणाव नव्हता. आम्ही आनंदाने राहत होतो."

ते म्हणाले, "तिने नीट परीक्षाही चांगली दिली होती. सर्व काही सुरळीत सुरू होते. कदाचित फेरपरीक्षेबाबत तिच्या मनात काही ताण किंवा भावना असाव्यात. मात्र मी कोणालाही दोष देत नाही. तिच्या मनात नेमके काय सुरू होते, हे आम्हाला समजू शकले नाही."

पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, घटनास्थळी कोणतीही सुसाईड नोट आढळून आलेली नाही. तसेच मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलिसांनी गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.


दरम्यान, राष्ट्रीय परीक्षा संस्थाद्वारे घेण्यात आलेली नीट-यूजी परीक्षा ३ मे रोजी पार पडली होती. प्रश्नपत्रिका फुटल्याच्या आरोपांनंतर ही परीक्षा रद्द करण्यात आली असून २१ जून रोजी फेरपरीक्षा आयोजित करण्यात आली आहे.

### बदलत्या हवामानामुळे हिमालयात वाढले संकट

# बद्रीनाथजवळ हिमनदीचा भाग तुटल्याने चिंतेत वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : बद्रीनाथपासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर कांचनजंगा नदी परिसरात हिमनदीचा एक भाग तुटल्याची घटना घडली असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. वाढत्या तापमानामुळे हिमनद्या वेगाने वितळत असल्याने प्रशासन सतर्क झाले असून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. सुरजीत सिंग पनवार यांनी प्रशासन सतत निरीक्षण करत असल्याची माहिती दिली.



दरम्यान, हिमालयातील हवामान बदलाचे गंभीर परिणाम आता स्पष्टपणे दिसू लागले आहेत. वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिओलॉजीच्या संशोधनानुसार हिमवृष्टीचे स्वरूप बदलत असून पूर्वी जानेवारी-फेब्रुवारीमध्ये होणारी सर्वाधिक हिमवृष्टी आता मार्च आणि एप्रिलमध्ये होत आहे. हे संशोधन जर्मनीतील एका जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे.

शास्त्रज्ञांच्या मते, पश्चिमी वाऱ्यांच्या प्रवाहातील बदलांमुळे हिवाळ्यात हिमवृष्टी कमी होत असून उन्हाळ्यात हिमवृष्टी, पाऊस आणि गारपिटीचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे हिमनद्यांचे वेगाने वितळणे सुरू झाले आहे. डॉ. पंकज चौहान यांनी सांगितले की, मार्च आणि एप्रिलमधील जास्त तापमानामुळे पडणारा बर्फ लगेच वितळतो, त्यामुळे हिमनद्या कमकुवत होत आहेत. पिंडारी हिमनदी आणि काफनी हिमनदीसह संपूर्ण मध्य हिमालय या बदलांचा परिणाम सहन करत आहे.

यावर्षी एप्रिलमध्ये पिंडारी आणि काफनी परिसरात १५८ सेंटीमीटर हिमवृष्टीची नोंद झाली, तर मार्चमध्ये ८४ सेंटीमीटर हिमवृष्टी झाली. जानेवारीमध्ये मात्र केवळ ९६ सेंटीमीटर हिमवृष्टी झाली. अभ्यासानुसार हिमनद्यांच्या परिसरातील तापमान सामान्यपेक्षा ०.१ ते ५ अंश सेल्सिअसने वाढले आहे.

हिमालयातील बदलते हवामान भविष्यात अन्नसुरक्षा, जलस्रोत, पर्यटन आणि फलोत्पादनावर गंभीर परिणाम करू शकते. हिमनद्यांचे वेगाने वितळणे भविष्यात पूर, भूस्खलन आणि नैसर्गिक आपत्तींचा धोका वाढवू शकते.